# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2019-20)/ 18/ of 2019**

परिपत्रक:

विषय:— मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रात नविन विद्याशाखा/ अभ्यासक्रम/ विषय/ अतिरिक्त तुकडया (पदवीपुर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता) सुरु करण्याकरिता प्रस्तावाची मुदतवाढीबद्दल.

संदर्भ:— विद्यापीठाची जाहीरात दिनांक ०६ आणि ०९ ऑगस्ट, २०१९

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रात शैक्षणिक वर्ष २०२०—२१ पासून नविन विद्याशाखा/ अभ्यासक्रम/ विषय/ अतिरिक्त तुकडया (पदवीपुर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता) सुरु करण्याकरिता कार्यपध्दती व निकष विहित करण्याबाबत इच्छूक महाविद्यालयांकडून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक १३ सप्टेबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णया नुसार दिनांक ०६ आणि ०९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या जाहिराती नुसार दिनांक १६ ऑगस्ट, २०१९ पर्यत ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने विस्तारीकरणाचे प्रस्ताव दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ ते १६ ऑगस्ट, २०१९ या दरम्यान अतिवृष्टी व मोठया प्रमाणात पाउस पडल्यामुळे विद्युत प्रवाह खंडीत झाल्यामुळे महाविद्यालयांना विहीत मुदतीत प्रस्ताव सादर करता न आल्यामुळे विस्तारीकरणाचे प्रस्ताव ऑनलॉईन सादर करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार दिनांक २० सप्टेबर, २०१९ पर्यत मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांना विनंती करण्यात येते की, इच्छुक महाविद्यालयांनी नविन विद्याशाखा/ अभ्यासक्रम/ विषय/ अतिरिक्त तुकडया (पदवीपुर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता) सुरु करण्याकरिता ऑनलाईन प्रस्ताव **दिनांक २० सप्टेबर, २०१९** पर्यत सादर करावेत व सदर प्रस्तावांच्या तीन प्रती (Hard Copy) दिनांक २१ सप्टेबर, २०१९ **सायंकाळी ५.०० पूर्वी संलग्नता मान्यता विभाग, कक्ष क्र. २०७, दुसरा मजला, मुंबई**

विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे दुसरा व चौथा शनिवार, रविवार आणि इतर सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त स्विकारले जातील.

(डॉ अजय देशमुख)
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.